# University of Mumbai

अवैध साधन चौकशी विभाग
परीक्षा भवन, महात्मा जोतिराव
फुले भवन, विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),मुंबई–४०००९८

क्र.परीक्षा/अवैध साधन/768/२०२३

संदर्भ :– क्र.परिक्षा अवैध साधन/७६६/२०२३ दि. ०९ ऑक्टोबर,२०२३

**परिपत्रक :–**

द्वितीय सत्र (हिवाळी) २०२३ साठी विद्यापीठ घेत असलेल्या तसेच विद्यापीठाच्या संबंधित महाविद्यालयातील परिक्षा सुरळीत व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी, तसेच संभाव्य गैरप्रकारास आळा बसावा म्हणून परिक्षा काळात परिक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी दक्षता पथकाची नियुक्ती मा.कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्या मान्यतेने प्रथम सत्र (उन्हाळी) २०२३ ला नेमणुका केलेल्या अध्यक्ष/सदस्य यांना दक्षता पथक(Vigilance Squad) म्हणून विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.परिक्षा अवैध साधन/७६६/२०२३ दि. ०९ ऑक्टोबर,२०२३ नुसार पुन्हा नियुक्त करण्यात आले आहे.

तरी द्वितीय सत्र (हिवाळी) २०२३ च्या परिक्षांसाठी दक्षता पथकातील सर्व अध्यक्ष व सदस्य यांच्यासाठी मार्गदर्शन बैठक गुरूवार दि. १९ ऑक्टोबर,२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता कविवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आली आहे.

दक्षता पथकातील सर्व अध्यक्ष व सदस्य यांना उपरोक्त वेळापत्रकानूसार सदर बैठकीत उपस्थित राहण्यास विनंती करण्यात येत आहे.

(डॉ.प्रसाद कारंडे)
प्रभारी संचालक,
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दि . १३ ऑक्टोबर,२०२३

अ. प्रति,

१) मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक

ब. प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :–

२) उपकुलसचिव/लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग.

CamScanner